CNR NO.MHST-0500 0307 2022

**वारस अर्ज क्र.८८/२०२२**
**श्रीमती अनुसया शिवराम चव्हाण**
**वि.**
**१. श्री. श्रीरंग शिवराम चव्हाण व इतर**

**<u>अर्जदारतर्फे विधीज्ञ – श्री. ए. एस. काळे.</u>**

**<u>सामनेवाला तर्फे विधीज्ञ – श्री. ए. आर. डांगे</u>**

## <u>निशाणी २६ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने मूळ अर्जातील परिच्छेद क्र.१ मधील ओळ क्र.४ मध्ये सुचविलेली दुरूस्ती करण्याची परवानगी मिळावी याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे.

०२. अर्ज व त्यावरील सामनेवाला यांच्या तर्फे त्यांचे विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले हस्तलिखित म्हणणे पाहिले. दोन्ही बाजूंच्या विद्वान विधीतज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. अर्ज व त्यावरील म्हणणे यामध्ये आलेल्या परस्पर विरोधी कथनांचा खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्यांवर मी माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदाराची प्रस्तावित दुरूस्ती पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्मित करण्यासाठी आवश्यक आहे काय ? | होकारार्थी. |
| २. | अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी. |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**मुद्दा क्र.१ व २ :–**

०४. अर्जदाराचे प्रस्तुत अर्जात असे कथन आहे की, अर्ज दाखल करतेवेळी मूळ अर्जात परिच्छेद क्र.१ मधील चौथ्या ओळीत अर्जदार क्र.४ असा मजकूर संगणकाचे व नजरचुकीचे दोषामुळे टंकलिखित झालेला आहे. त्या ऐवजी तो सामनेवाला क्र.४ असा असणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दुरूस्तीचा अर्ज दाखल केलेला आहे.

०५. सामनेवाला यांचे विधीज्ञांनी सदरचे अर्जावरच सविस्तर म्हणणे देवून अर्जामध्ये प्रस्तावित असलेली दुरूस्ती मंजूर करण्यास सक्तरित्या हरकती उपस्थित केलेल्या आहेत. त्यामध्ये सामनेवाला यांच्या प्रामुख्याने अशा हरकती आहेत की, दुरूस्तीचा अर्ज खोटा व लबाडीचा आहे. अर्ज कायदेशीर नाही. या सर्व बाबींचा विचार करता अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती सामनेवाला यांनी केलेली आहे.

०६. अभिलेख पाहिला असता असे दिसून येते की, अर्जदार यांनी मूळ चौकशी अर्ज वारस प्रमाणपत्र मिळावे यासाठी दाखल केलेला आहे. मूळ अर्जामध्ये परिच्छेद क्र.१ मधील चौथ्या ओळीत अर्जदार क्र.४ हा अर्जदार यांचा मुलगा आहे असे नमूद केलेले आहे. मूळ अर्जाची नोटीस लागल्यानंतर सामनेवाले न्यायालयात हजर होवून त्यांचे म्हणणे नि.क्र.१४, २३ वर अनुक्रमे दाखल केलेले आहे. त्यानंतर न्यायालयाने नि.क्र.२५ वर वाद मुद्यांची निश्चिती केलेली आहे. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुत अर्जाचे समर्थनार्थ श्रीमती अनुसया शिवराम चव्हाण यांचे शपथपत्र नि.क्र.२७ वर दाखल केलेले आहे. मूळ अर्जामधील परिच्छेद क्र.१ मधील चौथ्या ओळीमध्ये अर्जदार क्र.४ ऐवजी सामनेवाला क्र.४ असा मजकूर नमूद करणे आवश्यक आहे असे शपथेवर कथन केलेले आहे. त्यामुळे मूळ अर्जामधील परिच्छेद क्र.१ मधील चौथ्या ओळीमध्ये अर्जदार क्र.४ ऐवजी सामनेवाला क्र.४ असा मजकूर दुरूस्त करण्याची परवानगी दिल्यास सामनेवाला यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच सदरच्या दुरूस्तीमुळे मूळ अर्जाचे कथनात, मागणीमध्ये व स्वरूपामध्ये कोणताही बदल होणार नाही.

याउलट, प्रस्तुत दुरूस्ती करण्यास परवानगी दिली नाही तर कार्यवाही पुढे गेल्यास अडचणी निर्माण होवू शकतात. तसेच सदरची चूक ही संगणकीय हस्तदोषामुळे व नजरचुकीने झाल्याचे शपथेवर कथन अर्जदाराने केलेले आहे. या सर्व बाबींचा, कायदेशीर तरतूदींचा विचार करता प्रस्तावित दुरूस्ती ही पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्मित करण्यासाठी आवश्यक आहे असे अर्जदाराने सिध्द केलेले आहे म्हणून मी मुद्दा क्र.१ व २ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.३ च्या समर्थनार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज (निशाणी क्र.२६) चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांना मूळ अर्जामधील परिच्छेद क्र.१ मधील औळ क्र.४ मध्ये अर्जदार क्र.४ ऐवजी सामनेवाला क्र.४ असा अशी दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. मूळ अर्ज दुरुस्त केल्यानंतर / मजकूर समाविष्ट केल्यानंतर दुरुस्त अर्जाची प्रत अर्जदारांनी या आदेशाचे दिनांकापासून १४ दिवसांचे आत न्यायालयात दाखल करावयाची आहे.

४. सामनेवाला यांना मूळ अर्जाची दुरूस्ती झाल्यानंतर जादा म्हणणे/ पुरावा द्यावयाचा असल्यास ती मुभा/ परवानगी देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SUDHIR BALASAHEB TODKAR
Date: 2024.11.29 15:54:59 +0530

कराड. (एस. बी. तोडकर )

दिनांकः २९/११/२०२४ दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड.